महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२

दुरध्वनी क्रं. ०७१२-२९५९३८१ CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com


**जा.क्र.** महाज्योती/नागपूर/2234/2024-25 दिनांक -02/09/2024

# -: परिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा - 2023 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखतीच्या अर्थसहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता महाज्योती मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा - 2023 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व चाचणी/मुलाखतीकरीता एकरकमी अर्थसहाय्य योजनेचा लाभ देणेकरिता इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांकडून दि.01/08/2024 रोजी ते दि.10/08/2024 रोजी पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी अर्ज देखील या कार्यालयास सादर केलेले आहेत. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची तपासणी केली असता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेकरिता महाज्योतीमार्फत अर्थसहाय्य सुध्दा प्रदान करण्यात आलेले आहे, मात्र काही विद्यार्थी सदर योजनेकरिता अर्ज करण्याकरिता वंचित राहुन गेलेले आहे व अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी या कार्यालयास केलेली आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारी व मागणी विचारात घेता महाज्योती या कार्यालयामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षेच्या व्यक्तीमत्व चाचणी/मुलाखतीकरीता एकरकमी अर्थसहाय्य योजनेचा लाभ देणेसाठी विद्यार्थ्यांना **दि.05/09/2024 रोजी** पर्यंत अर्ज करण्याकरिता मुदवाढ देण्यात येत आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

स्वा

(राजेश खवले)

व्यवस्थापकीय संचालक

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था

(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.